नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक ११/०२/२०२२ (शुक्रवार)**

**(सायंकाळ)**

---

## अवैध रेती (गौणखनिज) चोरटी वाहतुक करणाऱ्याविरूध्द स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक ११/०२/२०२२ रोजी पहाटे चे सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रामटेक उपविभागात अवैध धंदयावर आळा घालणेकामी गस्त करीत असतांना पोलीस स्टेशन अरोली हद्दीत मौजा खात शिवारातुन अवैधरित्या बिनापरवाना रेती (गौणखनिज) ची चोरटी वाहतुक होत असल्याचे गापनिय माहिति मिळाल्यावरून सदर पथक मौजा खात शिवारात सापळा रचुन टिप्पर क्र. एमएच ४० बीएल ४९२१ सह चालक नामे लोकेश बावने रा. मौदा यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातील टिप्परने तो चोरटी वाहतुक करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचे ताब्यातुन टिप्पर क्र. एमएच ४० बीएल ४९२१ कि. २५,००,०००/— रू. व ०५ ब्रास रेती कि. २०,०००/— रू असा एकुण २५,२०,०००/— रू चा माल जप्त करण्यात आला. सदर चोरीची रेती कोठुन आणली आहे याबाबत चालकास अधिक विचारपुस केली असता त्याने त्याचा मालक आशिष मेहर रा. मौदा याचे सांगणे वरून टिप्पर मौजा इंदोरा येथील बंद रेती घाटावर नेल्याचे व तेथील इसम नामे शिशुपाल शेंगर रा. इंदोरा याचे मदतीने टिप्पर मध्ये रेती भरून दिल्याचे चालकाने सांगितल्यावरून तिन्ही आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन अरोली येथे कलम ३७९, १०९, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील कार्यवाही करीता टिप्पर चालास जप्त मुद्देमालासह पोस्टे अरोली यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणिकर यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनात सहा.पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, पोलीस नाईक रोहण डाखोडे, विपीन गायधने, अमोल वाघ यांचे पथकाने पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर